लोकमत

# विद्यापीठातर्फे परिसर छायाचित्रण स्पर्धेचे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने 'विद्यापीठ परिसर छायाचित्रण स्पर्धा'आयोजित केली आहे. त्यातील विजेत्यांना सुमारे ५० हजार रुपयांची पारितोषिके आणि प्रशस्तिपत्रे प्रदान करण्यात येणार आहेत, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

विद्यापीठ परिक्षेत्रातील गुणी कलाकार आणि छायाचित्रकार यांच्यासाठी विद्यापीठ परिसराच्या छायाचित्रणाची स्पर्धा आयोजित करावी. त्या माध्यमातून विद्यापीठ परिसराचे कलात्मक छायाचित्रण मोठ्या प्रमाणात उपलब्ध व्हावे, यादृष्टीने छायाचित्रण स्पर्धा आयोजित केली आहे.

विद्यापीठ परिसरातील नव्या, जुन्या इमारती आणि स्थापत्य, जलसाठे, उद्याने, जैवविविधता या विषयांवरील छायाचित्रे असावीत. छायाचित्रे सादर करण्याची अंतिम मुदत दि. ११ नोव्हेंबर दुपारी चार वाजेपर्यंत आहे. अधिक माहितीसाठी स्पर्धकांनी विद्यापीठाशी संपर्क साधावा, असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले आहे.



सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात गुरुवारी एकता रॅली काढण्यात आली. त्यात कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, आदींसह शिक्षक, कर्मचारी सहभागी झाले.

# सरदार पटेल, इंदिरा गांधी यांना अभिवादन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** भारताचे माजी उपपंतप्रधान सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती आणि माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी यानिमित्त त्यांना शिवाजी विद्यापीठात गुरुवारी आदरांजली वाहण्यात आली.

मुख्य प्रशासकीय इमारतीत कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे आणि प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते सरदार पटेल व इंदिरा गांधी यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, नेहरु अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. आर. पी. भणगे, आदी उपस्थित होते. दरम्यान, प्रतिमापूजनानंतर विद्यापीठ परिसरात एकता रॅलीचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये कुलगुरू डॉ. शिंदे, प्र-कुलगुरु डॉ. शिर्के, आदींसह शिक्षक, अधिकारी, कर्मचारी सहभागी झाले.

# शिवाजी विद्यापीठातर्फे परिसर छायाचित्र स्पर्धा

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातर्फे 'शिवाजी विद्यापीठ परिसर छायाचित्रण स्पर्धे'चे आयोजन केले असून या स्पर्धेसाठी सुमारे ५० हजार रुपयांची पारितोषिके व प्रशस्तिपत्रे प्रदान करण्यात येणार आहे. स्पर्धेत छायाचित्रकारांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले आहे.

विद्यापीठ परिसरातील नव्या, जुन्या इमारती आणि स्थापत्य, जलसाठे, उद्याने, जैवविविधता या विषयांवरील छायाचित्रे काढणे आवश्यक आहे. स्पर्धेतील प्रथम तीन विजेत्यांना अनुक्रमे २५ हजार, १५ हजार आणि १० हजार अशी पारितोषिके देण्यात येणार असून सर्व सहभागी स्पर्धकांना प्रशस्तिपत्रे देण्यात येणार आहेत. स्पर्धेसाठीची छायाचित्रे सादर करण्याची अंतिम मुदत ११ नोव्हेंबर २०१९ रोजी सायंकाळी चारपर्यंत आहे. छायाचित्रे स्पर्धकांनी उद्यान विभाग, अनेक्स बिल्डिंग, पहिला मजला, मुख्य प्रशासकीय इमारतीच्या पाठीमागे, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे दाखल करावीत.

स्पर्धेत सहभागासाठी वयाची अट अथवा भौगोलिक बंधन नाही. स्पर्धेसाठी कोणतेही शुल्क नाही. सहभागी स्पर्धकाला जास्तीत जास्त ५ छायाचित्रे सादर करता येतील. प्रत्येक छायाचित्राची ८ बाय १२ इंच आकाराची प्रत सादर करावी लागेल, तसेच त्या छायाचित्रांची हाय रिझॉल्युशन सॉफ्ट कॉपी सुद्धा सादर करणे आवश्यक आहे. स्पर्धेअंतर्गत सादर केलेले छायाचित्र ताजे, अलिकडच्या काळातले असावे. जुन्या छायाचित्रांचा विचार केला जाणार नाही. छायाचित्र कोठे काढलेले आहे, त्या ठिकाणाची थोडक्यात माहिती त्यासोबत द्यावी. छायाचित्रांचे संपादन, प्रोसेसिंग या विषयीची माहितीही सोबत द्यावी. कॅमेरा तसेच मोबाईलद्वारे काढलेल्या छायाचित्रांचा एकत्रितच विचार केला जाईल. त्यासाठी स्वतंत्र गट नाही. या बाबतचा अंतिम निर्णय परीक्षकांचा राहील.

# दहा विद्यार्थिनींचे जपानी परीक्षेत यश

कोल्हापूर टाइम्स टीम

शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागातील दहा विद्यार्थिनींनी 'जपानी भाषा प्राविण्य चाचणी परीक्षा' (जेएलपीटी) या जपानी भाषेतील आंतरराष्ट्रीय स्तरावरील परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवले. या विद्यार्थिनींना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याहस्ते आणि कुलसचिव डॉ. विलास नांदडवेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. यशस्वी विद्यार्थिनींमध्ये अस्मिता मिराशी, प्राजक्ता गुरव, दीपिका भोसले, मेहजबीन शेख, गौरी सूर्यवंशी, श्वेता पुरी, पूर्वा नाडगोंडा, रुचा शिंदे, सिमरन कदम व सायली तळवडेकर यांचा समावेश आहे. पूर्वा नाडगोंडा या विद्यार्थिनीने नोकरी आणि कुटुंब सांभाळत ९४ टक्के गुण मिळवून विशेष प्राविण्य प्राप्त केले.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, 'जपानी संस्कृती, तेथील दृढ नातेसंबंध आपल्याला भारतीय संस्कृतीची आठवण करून देतात. कोणतीही विदेशी भाषा शिकल्याने व्यक्तिमत्त्व विकसित होते. आपल्याला त्या भाषेची केवळ माहितीच होत नाही, तर त्या देशाचे लोक आणि त्यांचे जनजीवन आतून समजू लागतात.'

विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे म्हणाल्या, 'जपान फाउंडेशन' आणि 'जपान एज्युकेशनल एक्स्चेंजेस अँड सर्व्हिसेस' या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय स्तरावर 'जपानी भाषा प्राविण्य चाचणी परीक्षा' घेतल्या जातात. या परीक्षेत आंतरराष्ट्रीय स्तरावर शिवाजी विद्यापीठाने मिळविलेले यश नक्कीच कौतुकास्पद आहे. जपान व भारतातील आर्थिक परस्परसंबंध अधिकाधिक दृढ होत असल्याने अनेक जपानी कंपन्या भारतात आल्या आहेत. त्यातून जपानी भाषेच्या विद्यार्थ्यांना करियरमध्ये रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होतात. विदेशी भाषा विभागामध्ये रशियन, जर्मन, जपानी भाषांचे सर्टिफिकेट कोर्स शिकविले जातात. यावर्षी जपानी भाषा डिप्लोमा व पोर्तुगीज भाषा सर्टिफिकेट कोर्स सुरु झाले आहेत. तसेच पुढील वर्षीपासून फ्रेंच भाषा सर्टिफिकेट कोर्स सुरु होणार आहे.'

जपानी भाषा शिक्षिका स्नेहल शेट्ये यांनी आभार मानले. मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांच्यासह विद्यार्थी व पालक उपस्थित होते.



आंतरराष्ट्रीय जपानी परीक्षेतील शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागातील यशस्वी विद्यार्थिनींसमवेत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत डॉ. मेघा पानसरे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि स्नेहल शेट्ये.

# शिवाजी विद्यापीठात सरदार पटेल, इंदिरा गांधी यांना अभिवादन

**कोल्हापूर :** भारताचे माजी उपपंतप्रधान तथा लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती आणि माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त शिवाजी विद्यापीठात गुरुवारी आदरांजली वाहण्यात आली. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे आणि प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत सरदार पटेल व इंदिरा गांधी यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, नेहरू अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. आर.पी. भणगे यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. प्रतिमापूजनानंतर विद्यापीठ परिसरात एकता रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

# विद्यापीठात सरदार पटेल, इंदिरा गांधींना अभिवादन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

भारताचे माजी उपपंतप्रधान तथा लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती आणि माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त या दोघा नेत्यांना शिवाजी विद्यापीठात गुरुवारी आदरांजली वाहण्यात आली. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे आणि प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत सरदार पटेल व इंदिरा गांधी यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. दरम्यान, प्रतिमापूजनानंतर विद्यापीठ परिसरात एकता रॅलीचे आयोजन करण्यात आले. यामध्ये कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिक्षक, अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही.टी. पाटील, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी.के. गायकवाड, नेहरू अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. आर.पी. भणगे यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# दिवाळीतील वायू, ध्वनी प्रदूषणात घट

## शिवाजी विद्यापीठाचे सर्वेक्षण; फटाके उडवण्याचे प्रमाण घटल्याचा निष्कर्ष

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ३० : शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाने दिवाळीच्या पार्श्वभूमीवर शहरातील २२ ठिकाणी ध्वनी आणि वायू प्रदूषणाचे सर्वेक्षण केले. त्यासाठी त्यांनी तेथील हवेची आणि आवाजाची चाचणी घेतली. रविवार (ता. २७) ते मंगळवार (ता. २९) या कालावधीत ही चाचणी घेण्यात आली. यामध्ये गेल्या वर्षीच्या तुलनेत प्रदूषणाची पातळी घटल्याचे निदर्शनास आले.

दिवाळीमध्ये फटाके मोठ्या प्रमाणात उडवले जातात. त्यांचा आवाज आणि धूर यामुळे दिवाळीच्या कालावधीत सर्वाधिक प्रदूषण होत असल्याचे काही वर्षांपूर्वी निदर्शनास आले. या कालावधीत शहरांच्या भोवती वातावरणात कार्बनचा थर जमा झाल्याची छायाचित्रेही प्रसिद्ध झाली होती. त्यानंतर सुमारे दशकभर केलेल्या प्रबोधनानंतर फटाके उडवण्याचे प्रमाण कमी झाले. दरवर्षी शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाकडून दिवाळीच्या कालावधीत हवेतील प्रदूषणाची पातळी मोजण्याचे सर्वेक्षण केले जाते. यावर्षी प्रदूषणामध्ये घट झाल्याचे निदर्शनास आले. औद्योगिक वसाहती, नागरी वस्त्या तसेच बाजारपेठ, गर्दीची ठिकाणे येथील हवेचे नमुने घेतले जातात. यावर्षी गुजरी वगळता सर्वच ठिकाणी प्रदूषणात घट झाल्याचे दिसून आले.

पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. ए. एस. जाधव, डॉ. संदीप मांगलेकर, संशोधक विद्यार्थी चेतन भोसले, नीलेश शिंगाडे, सूरज पोवार, विनायक तुरुंबे, शीतल पाटील यांनी ध्वनीची पातळी मोजण्याचे काम केले.

| ठिकाणे | २०१८ | २०१९ |
|---|---|---|
| सीपीआर | ६१.९० | ५२.७६ |
| न्यायालय | ६२.६० | ५२.७६ |
| शिवाजी विद्यापीठ | ५४.३० | ५०.५४ |
| राजारामपुरी | ५४.५० | ५३.३१ |
| उत्तरेश्वर पेठ | ६२.८० | ६१.६५ |
| ताराबाई पार्क | ५६.९० | ५४.७८ |
| शिवाजी पेठ | ५८.९० | ५५.५६ |
| नागाळा पार्क | ५५.९० | ५२.९६ |
| मंगळवार पेठ | ५७.४० | ५३.८५ |
| शाहूपुरी | ६२.३० | ५९.०३ |
| लक्ष्मीपुरी | ६१.९० | ५८.३१ |
| महाद्वार रोड | ६३.७० | ६०.३३ |
| गुजरी कॉर्नर | ६३.४० | ६६.२७ |

# राधानगरी जंगलात सात देवरायांचे संवर्धन

## शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पती शास्त्र विभागाचा पुढाकार; दुर्मीळ प्रजातींची लागवड

**ओंकार धर्माधिकारी** : सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ३१ : राधानगरी अभयारण्यातील देवरायांचे संवर्धन करण्यासाठी वन विभाग आणि शिवाजी विद्यापीठाचा वनस्पती शास्त्र विभाग यांनी प्रकल्प हाती घेतला आहे. यात वनस्पती शास्त्र विभाग देवरायांतील दुर्मिळ वनस्पतींच्या प्रजातींची रोपे तयार करणार आहे. ही रोपे दोन वर्षांची झाल्यावर ती देवरायांत लावली जातील. यासाठी आवश्यक असणारे सर्वेक्षण, प्रजातींची निवड या सर्व गोष्टी वनस्पती शास्त्र विभागाने केल्या असून, या उपक्रमांतून राधानगरी येथील सात देवरायांचे संवर्धन केले जाणार आहे.**

पूर्वी काही गावांभोवती राखीव जंगल असायचे. हे जंगल देवाचे आहे, अशी धारणा आहे. यात्रेजत्रेला या जंगलात कोंबड्या सोडण्याची प्रथाही काही गावांत होती. जेणेकरून तेथे येणाऱ्या मांसभक्षी प्राण्यांना तेथेच खाद्य मिळेल व ते गावात येणार नाहीत. देवरायांच्या रूपाने गावाशेजारी एक हरितपट्टाच तयार व्हायचा. विविध प्रकारचे प्राणी, पक्षी, किटक देवराईमध्ये असायचे. काही जलस्त्रोतांचा उगमही देवराईमध्ये व्हायचा. एका अर्थाने पर्यावरणाचा समतोल राखणारी ही देवराई पर्यावरणीय दृष्टिकोनातून महत्त्वाची होती. कालांतराने देवरायांचीही तूट झाली. कधी शेतीसाठी तर कधी वस्ती वसवण्यासाठी देवरायांची तूट झाली, पण काही वर्षांत काही स्वयंसेवी संस्था, वन विभाग यांच्या प्रयत्नातून देवरायांच्या संवर्धनासाठी प्रयत्न सुरू आहेत.

याचाच एक भाग म्हणून वन विभागाने शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पती शास्त्र विभागाच्या मदतीने एक प्रकल्प हाती घेतला आहे.



### या वनस्पती

नाग केशर, सीता अशोक, सप्तरंगी, रान जायफळ (कायफळ), नाल जांभूळ, कडू कवठ, पेढू, खडशिंगी, गारंभी, ओंबळी, पिटगुळी, सिरोपेजीया, मंजीष्ठ.

**देवराईत मोठ्या प्रमाणात वनसंपदा आढळून येते. तेथे काही दुर्मिळ वृक्ष, वेली, ऑर्किड आहेत. ते फक्त याच परिसरात आढळून येतात. वनस्पती शास्त्र विभागाच्या प्रयत्नातूनन या वनस्पतींचे संवर्धन होणार आहे. देवरायादेखील संरक्षित होतील. वन विभागाच्या साहाय्याने या प्रकल्पावर काम सुरू आहे.**

**- प्रा. डॉ. वर्षा जाधव**, प्राध्यापक, वनस्पतीशास्त्र विभाग

याअंतर्गत देवराईतील दुर्मीळ वनस्पतींची लागवड वनस्पती विभाग करेल. त्याची रोपे तयार करून त्यांची दोन वर्षे देखभालही करेल. त्यानंतर दोन वर्षांची रोपे देवराईत लावली जातील.

यासाठी राधानगरी अभयारण्यातील ७ देवरायांची निवड केली. तेथील वनस्पतींचे सर्वेक्षणही वनस्पती विभागाने केले. प्रा. डॉ. वर्षा जाधव या प्रकल्पावर काम करत असून, त्यांनी संशोधनही केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 1 NOV 2019

Times of India

# A muted Diwali, but noise levels still above set limits

## Around 22 Areas Were Monitored For Four Days

Piyush.Bhusari
@timesgroup.com

**Kolhapur:** A noise-level monitoring report prepared by the students and research scholars of the department of environmental science of the Shivaji University, Kolhapur, stated that the noise pollution caused due to firecrackers this Diwali was less as compared to last year.

The report also stated that though the noise pollution was lesser this year, it was still above the permissible limit.

The researchers monitored the noise levels at various areas in the city. The assessment was done for a period of four days — from November 25 to November 29.

According to the report, Gujari corner recorded the highest noise pollution of 66 db this year as against the permissible limit of 55 db in the area.

The researchers said that the increasing awareness and drop in firecracker sales are among the major reasons behind the reduction in noise pollution this year.

As many as 22 areas including the collectorate office, Chhatrapati PramilaRaje hospital (CPR), Rajarampuri, collector office, Laxmipuri, Nagala park and Mahadwar road were monitored during the activity. The students had categorised the areas into residential, silence, commercial and industrial zones, said P D Raut, head of the department of environmental sciences at the SUK.

"Even though the noise levels have reduced as compared to previous few years, it was still above the permissible limits. It seems there is an increasing awareness among citizens and children. Most of the noise that has been generated was in the commercial area, especially on October 27. The night readings were taken during 8pm to 10pm in the designated areas," Raut said.

"Notably, the industrial zone, Y P Powar nagar and Udyamnagar complied with the noise level norms," he added.

Besides, commercial areas such as Laxmipuri, Mahadwar road and Gujari were found to be among the ones with highest noise pollution recorded this Diwali, said the report.

It has to be noted that residential areas, which according to the Central Pollution Control Board (CPCB) guidelines have to maintain a noise limit of 55 decibel during the daytime and 45 decibel during the night time, was nowhere in the frame as the minimum sound recorded at these areas did not follow the norms.

## NOT QUIET THERE YET



Pic: Rahul Gayakwad

### PERMISSIBLE SOUND LIMITS IN dB

| ZONE | DAY | NIGHT |
|---|---|---|
| Industrial | 75 | 70 |
| Commercial | 65 | 55 |
| Residential | 55 | 45 |
| Silent | 50 | 40 |

**According to the report, Gujari corner recorded the highest noise pollution of 66 db this year as against the permissible limit of 55 db in the area**

Noise level monitoring during Diwali in some of the areas

| AREA | NOISE (NIGHT) |
|---|---|
| ***SILENT** | |
| CPR | 52.76 |
| Court | 50.63 |
| Collector office | 55.35 |
| SUK | 50.54 |
| ***RESIDENTIAL** | |
| Rajarampuri | 53.51 |
| Tarabai Park | 54.78 |
| Shivaji Peth | 55.56 |
| Nagala Park | 52.96 |
| Mangalwar Peth | 53.85 |